| Particulars | Details |
|---|---|
| **Name of Department/Agency** | College of Engineering, Osmanabad |
| **Name of event** | Celebration of “ Marathi Raj Bhasha Gaurav Din” |
| **Start date of event** | 2/3/2022 |
| **End date of event** | 2/3/2022 |
| **Description of event** | Marathi Bhasha Gaurav Din is celebrated every year on 27th February on the birthday of veteran poet of Maharashtra Vishnu Vaman Shirwadkar alias Kusumagraj. Kusumagraj has made significant contribution in the cultural field of Maharashtra and tireless efforts have been made to make Marathi the language of knowledge. His birthday is celebrated as ‘Marathi Bhasha Gaurav Din ' to honour his mother tongue and to greet Kusumagraj's memory. Marathi Bhasha Gaurav Din was celebrated on 2nd March 2022 at Terna Engineering College, Osmanabad. For this, Dr. Tulshiram Ukirade was the chief guest. He told the history of Marathi language to the students. |






पुण्य नगरी २

# मराठी भाषेस शेकडो वर्षाचा इतिहास – डॉ. उकीरडे

**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**उस्मानाबाद:** मराठी भाषेला शेकडो वर्षाचा इतिहास आहे. कोणी कितीही मराठी भाषा संपुष्टात येईल म्हणून आरडाओरडा केला तरीही मराठी भाषा ही लोप पावणारी भाषा नाही. ठराविक अंतरावर तिची लय, सूर हा जरी वेगळा असला तरी तिच्यात माधुर्य आहे, असे प्रतिपादन तेरणा महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. तुळशीराम उकिरडे यांनी केले. शहरातील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त बुधवारी (दि.२) आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, उपप्राचार्य प्रा. एम. डी. पाटील, डॉ. उषा वडणे, प्रा. नागेश तौर, प्रा. सुनिता गुंजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. उकिरडे यांचा मराठी भाषा दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोप डॉ.माने यांनी केला. कार्यक्रमात वेदिका कुलकर्णी, सागर सलगरे, अश्विनी मोरे, ऐश्वर्या सक्राते आणि ऋचा धप्पाधुळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी आणि प्रथम वर्ष फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

# मराठी भाषा ही कधीच लोप पावणार नाही - डॉ. उकिरडे



उस्मानाबाद दि.५ (प्रतिनिधी) – मराठी भाषेला अनेक शतकांचा इतिहास आहे. ठराविक अंतरावर मराठी भाषेचा लय व सूर हा जरी वेगळा असला तरी देखील तिच्यात माधुर्य आहे. विशेष म्हणजे एकाच शब्दाला बहुसंख्य पर्याय हे फक्त मराठीमध्येच पहायला मिळतील. आपण कितीही सुधारणावादी झालो तरी आपल्याला मंगळाष्टका, पाळणा हा आपल्या मराठीतच गावा लागणार आहे. त्यामुळे कोणी कितीही मराठी भाषा संपुष्टात येईल म्हणून आरडाओरडा केला तरी देखील मराठी भाषा ही लोप पावणारी भाषा नाही, असे प्रतिपादन तेरणा महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा.डॉ. तुळशीराम उकिरडे यांनी केले.

उस्मानाबाद येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात मराठी राज्य भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने, उपप्राचार्य प्रा. एम.डी. पाटील, बेसिक सायन्स विभागप्रमुख प्रा.डॉ. उषा वडणे, प्रा. नागेश तौर आदी उपस्थित होते.

डॉ. उकिरडे यांनी आगामी काळात प्रकाशित होणार्या त्यांच्या आत्मकथातील काही भाग विद्यार्थ्यांसमोर कथन करताना ते म्हणाले की, माझ्या घरी अठराविश्व दारिद्र्य असताना देखील मी खडतर प्रवास करीत एका प्रथितयश महाविद्यालयात वरिष्ठ प्राध्यापक पदापर्यंत पोहोचलो. परंतू पहिला पगार आईच्या हातात देता आला नाही. कारण पहिला पगार येण्यापूर्वीच तिने या जगाचा निरोप घेतला होता अशी काळजाचा ठाव घेणारे एकेक शब्द बाहेर पडताना मात्र संपूर्ण सभागृह निशब्द झाले होते.

तर प्रास्ताविकात डॉ. वडणे म्हणाल्या की सुख असो की दुःख, प्रत्येक प्रसंगी आपल्याला पहिल्यांदा आपली आईच आठवते. त्याप्रमाणेच आपले आपल्या मातृभाषेवर सुद्धा प्रेम असते असे सांगितले. तसेच प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने म्हणाले की, अभियांत्रिकी सारख्या क्षेत्रात असूनही आमच्या विद्यार्थ्यांचे मराठी भाषेवर असलेल्या या प्रेमाचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यामुळे प्रत्येकानेच आपण मराठी असल्याचा अभिमान बाळगला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रा. सुनीता गुंजाळ यांनी उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अभियांत्रिकी व फार्मसी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.









| | | |
|---|---|---|
| **Nature of participation in event** | ▪ Jan bhagidari (open to public) | |
| **Expected number of participants in event** | 117 | |
| **Mode of Event** | ▪ Offline Event | |
| **Mode of advertisement of event** | ▪ Social Media | |
| **Nodal officer** | Name: | Prof. Mohammad Arshad J. Shaikh |
| | Designations: | Assistant Professor |
| | Email ID: | arsh1177@ymail.com |
| | Phone number: | 7020634605 |